प्रेस नोट दि.१४/३/२०१९

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा सिंधुदूर्ग यांचे कडून गुन्हयातील ५ फरारी आरोपींना रत्नागिरी येथून अटक.

---

कुडाळ पालीस टाणे गुन्हा रजि.नं. ११/२०१५ भाद.वि.क ४२०,४०६,३४ व महाराष्ट्र ठेविदारांचे हिसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ व ४ या गुन्हयातील आरोपी १) किरण सुधाकर आरेकर. रा. नेवरे मुगरवाडी ,रत्नागिरी , (२)महेश दत्ताराम पालकर रा. कारवाची वाडी रत्नागिरी. (३) गणेश बाळू शिंदे , रा. परेल मुंबई ,(४) यमचंद्र नारायण बनसोडे. रा.रेल्वे स्टेशन नजिक ,रत्नागिरी (५) युवराज सत्ताप्पा पाटील. रा. लालबाग मुंबई यांनी महाराष्ट्रात हिम्स हॉलीडे या नावाची व त्यास संलग्न इतर कंपन्या स्थापन करुन त्याव्दारे लोकांना वेगवेगळी अमिषे दाखवून त्यांचे कडून पैसे स्विकारुन व त्याची मुदत संपवूनही परत न दिल्याने सुमारे ३०,२५,७१९/- रुपये रक्कमेची फसवणूक केले बाबत त्यांचे विरुध्द कुडाळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदरचा गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून चालू होता. सदरचे आरोपी हे गुन्हा घडल्यापासुन फरारी होते. सदर आरोपींचे शोधावर स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी होते. त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे मा. पोलीस अधीक्षक श्री. गेडाम व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गोयल यांचे मार्गदर्शन खाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. प्रल्हाद पाटील, पोउनि श्री. रविराज फडणीस, सपोफौ/ एस.जी. खांदारे , पोहेकॉ/ गरुनाथ कोयंडे,, आशिष गंगावणे, कृष्णा केसरकर , अनुप खंडे, प्रविण वालावलकर ,संकेत खाडे , ज्ञानेश कांदळगांवकर, अमित तेली, जॅक्शन घोन्साल्वीस, रवी इंगळे, जयेश सरमळेकर याना मुंबई येथून मिळालेल्या माहिती वरुन रत्निागरी येथे सापळा रचून त्यांना सदर गुन्हयाचे कामी रत्नागिरी येथून ताब्यात घेवून त्यांना आर्थिक गुन्हे शाखेकडून पुढील कार्यवाही साठी देण्यात आलेले आहे.